


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७०३ . वा | शनिवार | दि. ०९ मार्च २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# मुंबईतील जागा भाजपला, पण लेकाच्या सीटसाठी शिंदे ठाम; शाहांच्या दरबारी जागावाटपाची खलबतं...

वृत्तसंस्था/ नवी दिल्ली

लोकसभा निवडणुकीसाठी राज्यात युतीतील जागावाटपाचा तिढा लवकरात लवकर सोडवण्यासाठी भाजपच्या सर्वेसर्वा नेतृत्वाने निर्णायक पावले उचलली आहेत. या मालिकेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार शनिवारी गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे पोहोचले. शहा यांच्यासह दोन्ही नेत्यांची बैठक रात्री उशिरापर्यंत चालली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे रात्री दिल्लीत आल्यावर आपले खासदार पुत्र श्रीकांत शिंदे यांच्या मीनाबागेतील सरकारी निवासस्थानी गेले व तेथून ते शहा यांच्याकडे पोहोचले. पवार व सुनील तटकरे सायंकाळी दिल्लीत येताच प्रफुल्ल पटेल यांच्या निवासस्थानी गेले. सुरुवातीला बैठक सायंकाळी सात वाजल्यापासून सुरू होणार असे सांगितले गेले, तरी प्रत्यक्ष दोन्ही नेते शहा यांच्याकडे पोहोचण्यास रात्री साडेनऊ वाजून गेले होते. त्यानंतर जागावाटपाबाबत सर्व नेत्यांमध्ये चर्चा झाली.सूत्रांच्या माहितीनुसार, भाजपने ठरवलेल्या सूत्रानुसारच जागावाटप होईल, या मुद्द्यावर तुटेपर्यंत न ताणण्याची तयारी भाजपकडून दाखवण्यात आली आहे. मात्र अजूनही शिंदे व पवार गटांना अपेक्षित तेवढ्या जागा देण्याची भाजप हायकमांडची तयारी दिसत नाही. विजयाची खात्री, हाच निकष भाजपने लावला आहे व यापुढेही लावू, असेही शहांनी पुन्हा स्पष्ट केल्याचे समजते.अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादीला एक आकडी जागा मिळण्याची शक्यता आहे. हा आकडा पाचपेक्षाही कमी असू शकतो. राष्ट्रवादी लोकसभेला कमी जागा घेऊन विधानसभेला अधिक जागा देण्याचं आश्वासन





घेण्याची शक्यता वर्तवली जात आहे.दुसरीकडे, मुंबईतील जागा भाजपला सोडण्यास शिवसेना तयार असल्याचंही बोललं जात आहे. परंतु ठाणे आणि लेकाच्या कल्याण मतदारसंघांसाठी शिवसेना ठाम आहे. ज्या खासदारांचं तिकीट कापलं जाईल, त्यांचं राजकीय पुनर्वसन करण्याचं केंद्रीय नेतृत्वाकडून आश्वासन मिळण्याची चिन्हं आहेत. विधानपरिषदेवरील रिक्त किंवा राज्यपाल नियुक्त कोट्यातून आमदारकी दिली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# आयशर व कारचा थरकाप उडविणारा भीषण अपघात...

## झालेल्या भीषण अपघातात १ ठार तर ३ जण गंभीर जखमी...

जनसंचलन/चिखली

बुलढाणा जिल्हावसियांची पहाटा आज धक्कादायक अपघाताने झाली आहे. जिल्ह्यातील चिखली व मेहकर रोडवर असलेल्या लवाळ्या फाट्याजवळ भयंकर भीषण अपघात झाला आहे. हा अपघात कार व आयशर ट्रकचा मध्ये झाला आहे.अपघात ऐवढा भयंकर होता की वाहनाचे तुकडे तुकडे झाले आहे. या अपघातामध्ये १ जण ठार झाले आहे तर ३ जण हे गंभीर जखमी झाले आहे. त्यांच्यावर चिखली येथील खाजगी रूग्णालयात उपचार सुरू आहे. हा अपघात आज दि ९ मार्च रोजी सकाळी ३.३० वाजेच्या सुमारास चिखली व मेहकर रोडवर असलेल्या लवाळा फाट्याजवळ झाला आहे. वैभव लोखंडे रा.चेतना नगर सुंदरखेड असे अपघा-






तात ठार झालेल्या तरूणाचे नाव आहे. तर अविनाश गव्हाने रा.सुंदरखेड,सागर सुरोशे रा.सुंदरखेड,सागर सुरोशे रा.सुंदरखेड,आदित्य सुरोशे रा. सुंदरखेड असे अपघातात जखमी झालेल्या तरूणाची नावे आहे.मेहकर कडून बुलढाण्याकडे येणारी कार होंन्डा अँमेज क्रमांक एम एच २८ बी .के.१७९५ बुलढाणाकडे येत होती. तर चिखलीवरून मेहकरच्या दिशाने जाणारे आयशर ट्रक क्रमांक एम.एच.१८.बी.जी.८२२५ हे मेहकरच्या दिशेने जात होते. लवाळा फाट्याजवळ हे दोन्ही वाहनाची समोरा समोर जबरदस्त धडक झाली आहे.अपघात ऐवढा भयकर होता की, वाहनाची तुकडे तुकडे झाले आहे.यामध्ये कार मधील १ तरूण हा जागीच ठार झाल आहे तर इतर ३ जण गंभीर जखमी झाले आहे.वैभव लोखंडे या तरूणाच्या जाण्याने सुंदरखेड तसेच बुलढाणा शहरवासियांवर दुखाचे डोंगर कोसळले आहे.घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले आहे. वृत्तलिहेपर्यंत पंचनाम सुरू होता.

# मेहकर बसला वैष्णव गड येथे थांबा!

जनसंचलन / सिंदखेडराजा

मेहकर आगारातून सिंदखेडराजाकडे तसेच मेहकरकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या बसेस ह्या वैष्णव गड फाटा येथे थांबवा, अशा सूचना महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाच्या बुलडाणा नियंत्रकांनी मेहकर व्यवस्थापक यांना दिले आहेत. विभाग आगार वैष्णव गड हे क्षेत्र या भागात प्रसिद्ध देवस्थान असून येथे भाविकांचा नेहमीच राबता असतो. तसेच गडाच्या पुढे पिंपळ खुटा, जळगाव ही गावे असल्याने येथील नागरिक, प्रवासी, विद्यार्थ्यांना बसेस थांबत नसल्याने मोठा त्रास सहन करावा लागत होता. मात्र वैष्णव गड संस्थांच्या वतीने विभाग नियंत्रकांना पत्र पाठवून विनंती थांबा देण्याची मागणी केली होती.



# मेहकर शहर व तालुक्यातील अवैध धंदे बंद करा

## जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदनाद्वारे मागणी



**जनसंचलन/मेहकर**

मेहकर शहर व तालुक्यात मोठ्या प्रमाणात अवैध धंदे सुरू असून याचे परिणाम समाज मनावर होत असून पोलीस प्रशासनाने तात्काळ अवैध धंदे बंद करावे या मागणीसाठी मेहकर येथील नागरिकांनी ६ मार्च रोजी पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयात येऊन निवेदन दिले आहे. दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मेहकर शहर व तालुक्यात बरेच दिवसापासून अवैध धंदे (वरली, मटका, दारू, जुगार,चक्री) सुरू असून ह्या अवैध धंद्यामुळे कायदा व सुव्यवस्था बिघडलेली आहे. मेहकर शहर हे पवित्र शारंगधर बाल-जी, हजरत पंचपीर बाबा तसेच ऐतिहासिक व पवीत्र परंपरा लाभलेले शहर आहे. या शहरात बरेच विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी ग्रामीन भागातून येत असतात व गल्ली बोळात सुरू असलेल्या अवैध धंद्यांचा त्यांच्यावर सुध्दा वाईट परीणाम होत आहे. त्याच प्रमाणे मोलमजुरी करणारे सामान्य माणसे सुध्दा ह्या अवैध धंद्याकडे आकर्षीत होवुन त्यामध्ये दिवसाकाठी कमावलेली कमाई अवैध धंद्यात टाकतात, त्यामुळे त्यांचे संसार उद्ध्वस्त होण्याची वेळ आली आहे. या सर्व बाबींचा विचार करून मेहकर तालुका व शहरात सुरू असलेले अवैध धंदे त्वरीत बंद करण्यात यावे, अशी मागणी रिपब्लिकन सेनेचे तालुका अध्यक्ष गजानन जाधव, विनोद गवई, पुष्पा नरवाडे, प्रभा मोरे, नाजमीन शेख, संगीता गवई व इतरांनी निवेदनाद्वारे केली आहे. मागणीकडे दुर्लक्ष केल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा देखील देण्यात आला आहे.

# रस्त्यात अडवून तरुणाला मारहाण...



**जनसंचलन / खामगाव**

खामगाव रस्त्यात अडवून तरुणाला मारहाण करून जखमी केल्याची घटना स्थानिक नांदुरा रोडवरील कॉलेजजवळ घडली याबाबत चौघांवर शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. जलंब येथील शुभम मोहे हा तरुण ६ मार्च रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास आपल्या मोटरसायकलने खामगावकडे येत असताना जी.एस. कॉलेज जवळ दुचाकी आडवी लावून प्रथमेश सोळंके, ओम देशमुख दोन्ही राहणार वाडी व इतर दोन अशा चौघांनी संगणमत करून अडविले व त्याला यापुढे तू खामगावात दिसला तर तुला जीवे मारून टाकू अशी धमकी दिली. तसेच ओम देशमुख याने हातातील स्टीलचे कडे डोक्यात मारून शुभमला जखमी केले आहे. तर प्रथमेश सोळंके यांनी चाकू काढून शुभम वर वार करण्याचा प्रयत्न केला परंतु शुभमचा चुलतभाऊ घटनास्थळी आला असता या चौघांनी घटनास्थळावरून पळ काढला. याबाबत शुभम मोहे याने खामगाव शहर पोस्टेला दिलेल्या तक्रारीवरून खामगाव शहर पोलिसांनी उपरोक्त चारही आरोपींविरुद्ध कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ भादवी चा गुन्हा दाखल केला आहे याबाबत अधिक तपास पोहे का गजानन पाटील करीत आहे

# कर वसूल रकमेचे टॅक्स बिलात समायोजन करा...

**जनसंचलन / शेगाव**

या वर्षाच्या मालमत्ता कराची वसुली २००८-२०१२ च्या मूल्यांकनानुसार करा, तसेच २०१२ ते २०२२ दरम्यान अतिरिक्त करवसूल रकमेचे टॅक्स बिलात समायोजन करा, अशी मागणी काँग्रेस शहराध्यक्ष किरण देशमुख यांनी न. प. मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली. निवेदनानुसार, शेगाव नगर परिषदेच्या २०१२-२०२२ दरम्यानच्या मूल्यांकन निर्धारणाच्या प्रक्रियेबाबत सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेवर विवाद सुरू असून, त्यावर अंतिम निर्णय येणे बाकी आहे. त्यामुळे २०२३-२४ वर्षाच्या मालमत्ता कराची वसुली विवादास्पद कालावधीच्या अगोदरच्या २००८-१२ च्या कर आकारणीनुसार करण्यात यावी, तसेच या विवादित कालावधीत न. प.कडून जो अतिरिक्त कर वसूल करण्यात आला, त्या रकमेचे चालू वर्षाच्या मागणी बिलात समायोजन करण्यात यावे, सन २०२३-२४ आर्थिक वर्ष संपत असून, २५ दिवस शिल्लक असताना न. प.कडून टॅक्स वसुली होणे गरजेचे आहे. कर मात्र मागील ८ वर्षांपासून कर मूल्यांकनाबाबत नागपूर उच्च न्यायालय, दिल्ली सर्वोच्च न्यायालय येथे दाखल याचिकांवर वाद सुरू आहे.

# वन बुलडाणा मिशनच्या वतीने महाशिवरात्रीनिमित्त विविध ठिकाणी फराळ वाटप!...

**जनसंचलन /बुलडाणा**

वन बुलडाणा मिशनच्या वतीने महाशिवरात्रीनिमित्त जिल्ह्यात विविध ठिकाणी फराळ वाटप करण्यात आले. वन बुलडाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके यांच्या सुचनेनुसार ४० पेक्षा अधिक ठिकाणी फराळ वाटप करण्यात आले. राजर्षी शाहू मल्टीस्टेट को- ऑप. क्रेडिट सोसायटीच्या अध्यक्षा मालतीताई शेळके यांच्या हस्ते विविध ठिकाणी फराळ वाटपाचा कार्यक्रम पार पडला. डोंगरशेवली, साकेगाव, राजुर, भोरटेक, शेंबा, दाताळा,




रोहिणखेड, पातुर्डा, संग्रामपूर, मैलपेंड, जळगाव जामोद, येरळी, काकनवाडा, धामणगाव बढे, लिहा, खामगाव, मेरा, देऊळगावमही, जानेफळ, उटी, अंजनी, मांडवा यासह विविध ठिकाणी कार्यक्रम पार पडले.

# दहावीच्या परीक्षेला जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ऑटोची पीकअपला धडक; ५ जण जखमी

**जनसंचलन /मोताळा**

मलकापूर-बुलढाणा रोडवर रस्त्याच्या बाजुला उभ्या असलेल्या पीकअपला ऑटोने धडक दिली. सदर अपघात गुरुवार ७ मार्च रोजी सकाळी ९.३० वाजेच्या सुमारास घडला. या धडकेत ऑटोचालकासह दहावीच्या परिक्षेला जाणारे ४ विद्यार्थी जखमी झाले. २ विद्यार्थ्यांना जास्त मार लागल्याने त्यांना पेपर देता आला नाही. वाघजाळ फाटा येथून ऑटो क्र.एम.एच.१९ ओएक्स. ०११७ मोताळाकडे जात होते. या ऑटोमध्ये ४ विद्यार्थी दहावीच्या परिक्षा देण्यासाठी चालले होते. दरम्यान ऑटोने सकाळी ९.१५ वाजेच्या सुमारास मलकापूर रोडवरील फॉरेस्ट ऑफिस जवळील पाण्याच्या टाकीजवळ उभ्या असलेल्या पीकअप क्र.एम.एच. १४ सीपी-३५७१ ला धडक दिली या धडकेत ऑटोमधील उदय बोराडे (वय १६), चेतन वाकोडे (वय १६), चेतन महादेव वाकोडे (वय १६), मुस्तकीन (वय १६) व ऑटोचालक राहुल वाघ हे जखमी झाले. जखमींना रणजीत राजपूत यांनी बुलढाणा येथे उपचारार्थ दाखल केले. उपचार घेवून दोन विद्यार्थ्यांनी परिक्षा दिली तर उदय बोराडे व मुस्तकीन यांना जास्त मार लागल्यामुळे ते पेपर देवू शकले नाही. घटनेची




माहिती मिळताच बोराखेडी पोलिस घटनास्थळावर पोहचले होते.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी महिलांचा सहभाग आवश्यक - जिल्हा परिषद सिईओ विशाल नरवाडे

जनसंचलन/ बुलढाणा

८ मार्च रोजी सर्व क्षेत्रात महिलांनी आपले कर्तृत्व सिध्द केले आहे. महिलांच्या सहभागाने देशाची प्रगती उंचावत आहे. लोकशाही मुल्य रूजविण्यासाठी व तळागाळातील सर्व महिला भगिनींना त्यांचे अधिकार मिळवून देण्यासाठी संघटीत प्रयत्नांची गरज असून सर्वांनी त्यासाठी पुढकार घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांनी केले. बुलढाणा जिल्हा परिषदेच्या महिला व बाल कल्याण विभागाच्यावतीने आज जागतिक महिला दिनाच्या औचित्यावर मोटार सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी झालेल्या छोटेखानी समारंभात ते बोलत होते. यावेळी महिला व बाल कल्याण विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद एंडोले, समाज कल्याण अधिकारी मनोज मेरत, सिंचन विभागाचे कार्यकारी अभियंता विशाल पिंपळे, जिल्हा परिषद कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष राजेश वाईदेशकर, जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्थेच्या संचालक पुष्पा संजय गायकवाड, गजानन सावंत, गजानन गायकवाड व अन्य मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. पुढे बोलतांना विशाल नरवाडे म्हणाले की, भारत हा लोकशाहीप्रधान देश आहे. सशक्त लोकशाही व्यवस्थेसाठी महिलांनी शासन



व्यवस्थेतसुध्दा त्यांचा सहभाग वाढविणे गरजेचे आहे. त्यामुळे महिलांसाठी असलेल्या विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसोबतच महिलांनी त्यांच्या अधिकारांची जाण ठेवावी. सोबतच संविधानाने दिलेल्या अधिकारांबाबत समाजात जाणिव जागृती निर्माण करून तळागाळातील प्रत्येक महिलेला न्याय मिळेल यासाठी संघटीत प्रयत्न करावेत, असे ही आवाहन त्यांनी केले. जागतिक महिला दिनाच्या औचित्यावर आयोजित या मोटर सायकल रॅलीमध्ये जिल्हा परिषदेच्या सर्व महिला कर्मचारी प्रामुख्याने सहभागी झाल्या होत्या. जिल्हा परिषद आवारातून सुरू झालेल्या या रॅलीस मुख्य प्रवेशव्दारासमोर मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांनी हिरवी झेंडी दाखवून रॅलीचा शुभारंभ झाला. शहरातील मुख्य मार्गावरून मार्गक्रमण केल्यानंतर जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीसमोर रॅलीचा समारोप करण्यात आला. प्रारंभी जिल्हा परिषदेच्या मुख्य इमारतीतील राष्ट्रमाता मॉ जिजाऊंच्या प्रतिमेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांच्या हस्ते पूजन व अभिवादन करण्यात आले. आगामी लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर या रॅलीमध्ये महिला मतदार नोंदणी, निवडणूक प्रक्रीयेतील महिलांचा सहभाग, मतदार जाणीव जागृतीसोबतच विविध योजनांची माहिती , घोषवाक्य दर्शविणारे फलक विशेष आकर्षण होते. रॅलीच्या यशस्वी आयोजनासाठी महिला व बाल कल्याण विभागाचे विस्तार अधिकारी पवार, सपकाळ, अलका राऊत, खरे , सुजित हिवाळे, सुनिल लोखंडे यांनी परिश्रम घेतले.

# सैनिक कल्याणच्या पदभरतीमध्ये अर्ज करण्यास मुदतवाढ...

जनसंचलन /बुलडाणा



जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या सरळसेवेतील पदभरतीसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. सैनिक कल्याण विभागाच्या जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील गट-क ची पदे भरण्यासाठ ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले आहे. अर्ज करण्यासाठी दि. १२ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून दि. ३ मार्च २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत हा कालावधी देण्यात आला होता. परंतू लोकहितार्थ ऑनलाईन अर्ज मागविण्याचा कालावधी दि. ४ ते २४ मार्च २०२४ पर्यंत सायंकाळी ६ वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे. याचा माजी सैनिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

# पीएम विश्वकर्मा कौशल्य विकास योजनेचा दिव्यांगांनी लाभ घ्यावा-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

जनसंचलन/बुलढाणा

ग्रामीण आणि नागरी व्यवस्थेतील कारागीरांना शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्यासाठी पीएम विश्वकर्मा कौशल्य विकास योजना राबविण्यात येत आहे. यात जिल्ह्यातील दिव्यांगांनी प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले आहे. पीएम विश्वकर्मा योजनेत १८ अभ्यासक्रमाच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात येत आहे. या प्रशिक्षणादरम्यान ५०० रूपये प्रती दिवसाप्रमाणे मानधन देण्यात येते. तसेच १५ हजार रूपयांचे व्हाऊचर साहित्य खरेदीसाठी देण्यात येते. यासाठी ऑनलाईन अर्ज करावा लागतो. त्यानंतर ग्रामपंचायत किंवा नगरपालिकेकडे या अर्जाची छाणणी होते. त्यानंतर जिल्हास्तरावरील पोर्टलवरून राज्यस्तरावर मंजुरी देण्यात येते. अर्ज स्विकृत होऊन प्रशिक्षण घेतल्यानंतर संबंधित व्यक्तीस १ लाख रूपयांचे कर्ज ५ टक्के व्याजदराने उपलबध करून देण्यात येते. या कर्जाची परतफेड केल्यानंतर २ लाख रूपयांचे कर्ज दिले जाते. सदर कारागीरांना विश्वकर्मा म्हणून मान्यता देणे, त्यांचे कौशल्य वाढविणे, व्यवसायासंबंधी योग्य प्रशिक्षण देणे, चांगल्या आणि आधुनिक साधनांसाठी सहाय्य प्रदान करणे, विनातारण, सवलतीच्या व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देणे, डिजिटल व्यवहारासाठी प्रोत्साहन देणे, ब्रँड प्रमोशन आणि मार्केट लिंकेजसाठी एक व्यासपीठ प्रदान करणे, ही या योजनेची उद्दीष्टे आहेत. या योजनेमधून नोंदणीकृत कारागीरांना पारंपारिक कारागीर म्हणून शासनाची मान्यता प्रमाणपत्र आणि ओळखपत्राद्वारे विश्वकर्मा म्हणून मान्यता, कौशल्य पडताळणी नंतर ५-७ दिवस मूलभूत प्रशिक्षण, इच्छुक उमेदवार १५ दिवस प्रगत प्रशिक्षण, प्रशिक्षण विद्यावेतन दररोज ५०० रुपये, टूलकिटसाठी प्रोत्साहन म्हणून १५ हजार रुपयांचे व्हाऊचर, वित्तसहाय्य, तारणमुक्त व्यवसायिकता विकासकर्ज ३ लाखापर्यंत कर्ज उपलब्ध करून दिले जाणार आहे. तसेच सवलतीचा व्याजदर एमएसएमईद्वारे ८ टक्के व्याज सवलत मयदिसह लाभार्थीकडून ५ टक्के शुल्क आकारले जाणार आहे, हे लाभ मिळणार आहे. सदर योजनेचा लाभ प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेंतर्गत नोंदणीसाठी पात्र असणार आहे. यात लाकूड आधारीत सुतार, बोट निर्माता, औजारे तयार करणारा लोह, धातू आधारीत, दगड आधारीत ब्रॉस, पितळ, तांबे, डायस, भांडी मुर्ती आदी निर्मितीचा समावेश आहे. तसेच लोहार, हॅमर आणि टुलकिट मेकर, कुलुपे बनविणारा मुर्तीकार, स्टोन ब्रोकर, सोने चांदी आधारीत सोनार, मातीवर आधारीत कुंभार, लेदर आधारीत मोची , शु स्मिथ पादत्राणे कारागीर, स्थापत्य गवंडी, गवंडीकाम, इतर बास्केट, मॅट, झाडू निर्माता, काचांचा व्यवसाय करणे, बाहुली आणि खेळणी निर्माता, न्हावी, माला निर्माता माळी, परीट, शिंपी, मासेमारी जाळी बनविणारा या १८ अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या योजनेच्या लाभासाठी नोंदणीच्या तारखेस लाभार्थ्यांचे वय १८ वर्षे पूर्ण असावे, लाभार्थी नोंदणीच्या तारखेस संबंधित व्यवसायात गुंतलेला असावा आणि स्वयंरोजगार, व्यवसाय विकासासाठी केंद्र सरकार किंवा राज्य सरकारच्या तत्सम पत-आधारित योजना यात पीएमईजीपी, सीएमईजीपी, पीएम स्वनिधी, मुद्रा योजनेंतर्गत मागील ५ वर्षात कर्ज घेतलेले नसावे. या योजनेंतर्गत नोंदणी आणि लाभ कुटुंबातील एका सदस्यापुरते मर्यादित राहणार आहे. सरकारी सेवेत असलेली व्यक्ती आणि त्यांचे कुटुंबीय या योजनेसाठी पात्र ठरणार नाही,

# वीज मंडळ कंत्राटी कामगारांचे बेमुदत संपाला सुरूवात...

जनसंचलन / सिंदखेडराजा

महानिर्मिती,महावितरण आणि महापारेषण या तिन्ही वीज कंपन्यातील कंत्राटी कामगार हे अनुभवी व कुशल असून ते मागील १५ ते २० वर्षापासून काम करीत आहे. अशा सर्व वीज कंत्राटी कामगारांच्या विविध मागण्या आजपर्यंत अनेक संघटनांनी शासन व प्रशासन दरबारी मांडल्या आहेत. मात्र या कामगारांना अद्याप रास्त न्याय मिळाला नाही. त्यामुळे राज्यातील तिन्ही वीज कंपनीत कार्यरत विविध कंत्राटी कामगारांच्या सर्व संघटना प्रमुखांनी एकत्र येऊन महाराष्ट्र राज्य वीज मंडळ कंत्राटी कामगार संघटना संयुक्त कृती समिती २०२४ स्थापन केली असून त्यांच्या वतीने कंत्राटी कामगारांच्या मागण्या मांडण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने सर्व मागण्यांची पूर्तता करत संयुक्त कृती समितीच्या सर्व सदस्यांना चर्चेला पाचारण करून रास्त मागण्या मान्य करण्याची विनंती एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



महाराष्ट्र राज्य वीज मंडळ कंत्राटी कामगार संघटनेने रास्त मागण्यासाठी संप पुकारलेला आहे. दि.९ फेब्रुवारी पासून एकुण पाच टप्प्यांमध्ये आंदोलन सुरू असून कंत्राटी कामगारांच्या मागण्या पूर्ण न झाल्याने आज दि.५ मार्च पासून काम बंद आंदोलन करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने आंदोलनामध्ये मोठ्या संख्येने कंत्राटी कामगार सहभागी झाले होते. यावेळी दुसरबीड येथील १३२ केव्ही महापारेषणसमोर महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक संघटना १७०१ अकोला झोनचे कार्याध्यक्ष तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय खारडे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी वीज मंडळ कंत्राटी कामगार शेख रहेमान, सदानंद नागरे, बि.पी.केकान, जि.एम.जाधव,डि.आर.सोनुने,व्हि. एस.चव्हाण, ए.एस.राठोड, जी.खार्डे,किरण खंदारे, योगेश ससाने, दीपक सांगळे, शिवाजी मुंढे, रामदास कव्हळे यांच्यासह महावितरण,महापारेषण आणि महानिर्मिती वीज मंडळाचे कंत्राटी कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# आयशर ट्रकचा भीषण अपघात: तीन ठार, एक गंभीर...

## तालसवाडा फाट्याजवळ सकाळी झाला अपघात



**जनसंचलन/मलकापूर**

भरधाव आयशर ट्रकच्या भीषण अपघातात तीन जण ठार तर एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना राष्ट्रीय महामार्ग ५३ वर तालसवाडा फाट्याजनीक ८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११:३० वाजताच्या सुमारास घडली. या घटनेनंतर महामार्गावर तब्बल दोन तास वाहतूक खोळंबली होती. पाचोऱ्या येथील एम.एच.१९, सी.एक्स.०९७७ क्रमांकाचे आयशर वाहन भुसावळ येथून अकोल्याकडे येत होते. राष्ट्रीय महामार्गावर तालसवाडा फाट्याजनीक विरुद्ध दिशेने भरधाव आलेल्या एम.पी.१४, एच.सी.३७८६ क्रमांकाच्या ट्रक व आयशरमध्ये समोरासमोर भीषण धडक झाली. हा अपघात इतका भीषण होता की दोन्ही वाहनांच्या दर्शनी भागाचा चुराडा झाला, आयशर वाहक सचिन ज्ञानेश्वर पिलोरे (वय ३२) रा. पतखडी (बेलदार - वाडी) जळगाव खान्देश व ट्रकचालक रघुवीर सिंह (वय ३९) पाटणीया मध्य प्रदेश हे दोघे जागीच ठार झाले. अपघाती वाहनांमध्ये अडकलेल्या दोघांना क्रेनने बाहेर काढून उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. रुग्णालयात गंभीर जखमींवर शर्थीचे उपचार करण्यात आले. मात्र दोघांची प्रकृती खालावल्याने त्यांना बुलढाणा व जळगाव खान्देश हलविण्यात आले. त्यापैकी समाधान यमराज पवार (वय ३८) रा. लव्हारा पाचोरा यांचा बुलढाणा नेत असताना दाताळानजीक मृत्यू झाला. दुसरा गंभीर जखमी रामलाल मीना (वय ४८) रा. पाटलिया मध्य प्रदेश याला जळगाव खान्देश येथील रुग्णालयात हलविण्यात आले आहे. राष्ट्रीय महामार्गाची गत काही दिवसांपासून तालसवाडा ते दसरखेड दरम्यान वाहतूक एकतर्फी करण्यात आली आहे. त्यामुळे वाहनधारकांचे नियंत्रण सुटल्याने अपघात घडल्याची माहिती आहे.

# जागेच्या वादातून एकावर हल्ला; गुन्हा दाखल बाळापूर नाका परिसरातील घटना

**जनसंचलन / खामगाव**

वाद सुरू असलेल्या जागेवर बांधकाम करण्यास मनाई केल्याने आरोपींनी संगनमत करून एकावर प्राणघातक हल्ला केला. ही घटना स्थानिक बाळापूर फैलात बुधवारी सायंकाळी घडली. या प्रकरणी तक्रारीवरून शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. तक्रारीनुसार, बाळापूर नाका परिसरात वाद सुरू असलेल्या जागेवर बांधकाम करण्यास करमजितसिंग मनमोहनसिंग जुनेजा (वय ३५) यांनी मनाई केली. त्यावेळी आरोपींनी संगनमत करून जिवे मारण्याच्या उद्देशाने रा. खापगाव यास आरोपींनी जिवे मारण्याच्या उद्देशाने लोखंडी सळई, खुर्ची तसेच लाथाबुक्क्यांनी व फावड्याच्या लाकडी दांड्याने मारहाण करून गंभीर दुखापत केल्याचा आरोप करण्यात आला. त्यानुसार शहर पोलिसांनी आरोपी मोहम्मद हमीद मोहम्मद रफिक, शेख बसिम शेख रफिक, शेख मतीन मो. हमीद, शेख ऐहफाज शेख अनिस, शेख अरबाज शेख अनिस, शे. अनिस मो. रफिक, शेख आसिम मो. हमीद व नावेद इद्रीस रईस इद्रीस सर्व रा. बर्डे प्लॉट, खामगाव यांच्याविरुद्ध भादंवि कलम ३०७, १४३, १४६, १४७, १४९, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा दाखल केला. पुढील तपास पो. उपनि, नीलेश लबडे करीत आहेत.

# दुचाकीवरून पडल्याने महिला गंभीर जखमी खामगाव-शेगाव रोडवरील घटना

**जनसंचलन / खामगाव**

गतिरोधकावरून दुचाकी उसळून झालेल्या अपघातात एक ४० वर्षीय महिला गंभीर जखमी झाली. ही घटना शुक्रवारी खामगाव शेगाव रोडवरील विद्युत भांडारसमोर घडली. प्राप्त माहितीनुसार, जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील चिकनगाव येथील रहिवासी अरुणा हरी तायडे (४०) या दुचाकीने शेगावकडे जात होत्या. दरम्यान, शेगाव रोडवरील विद्युत भांडारसमोरील गतिरोधकावर दुचाकी उसळल्याने त्या गंभीर जखमी झाल्या. जखमी अवस्थेत त्यांना त्वरित खामगाव येथील सामान्य रुग्णालयात भरती करण्यात आले. मात्र, प्रकृती अत्यवस्थ झाल्याने त्यांना त्वरित अकोला येथील सर्वोपचार रुग्णालयात हलविण्यात आल्याचे सामान्य रुग्णालयातील सुत्रांनी सांगितले.

# बुलढाणा शहरात विविध ठिकाणी महाशिवरात्री मोठ्या उत्साहात साजरी...

## अनेक ठिकाणी आध्यात्मिक यात्रा व फराळ वाटपाची रेलचल



**जनसंचलन/बुलढाणा**

महाशिवरात्रीचा उत्सव जिल्ह्यात ठिकठिकाणी उत्साहात साजरा करण्यात आला अनेक ठिकाणच्या शिवमंदिरामध्ये ८ मार्च रोजी सकाळपासूनच भाविकांची गर्दी झालेली दिसून आली तर काही ठिकाणी शिव मंदिरासमोर भव्य आध्यात्मिक यात्रा महोत्सव पार पडला. यामध्ये भाविकांनी शिवपूजन व दर्शनाचा लाभ घेतला. विशेष म्हणजे प्रामुख्याने महिला भाविकांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती. जिल्ह्यात अनेक ठिकाणी शिवमंदिर आहेत. . महाशिवरात्रीनिमित्त कोलवड,डोंगरशेवली,राजूर या मंदिरांमध्ये मोठ्या प्रमाणात महिलांनी गर्दी केली होती मनोभावे पूजन करून दर्शन घेतले त्याचप्रमाणे अनेक ठिकाणी फराळाचे वाटपही करण्यात येत होते. जिल्ह्यातील ओलांडेश्वर संस्थान दुधा, ब्रह्मपुरी, शिवचंद्र मोळी, मुंदेफळ, अंजनी खुर्द, खामगाव तालुक्यातील कमळनाथ, किन्ही महादेव या व इतर ठिकाणी तर यात्रा होत्या. यात्रेमध्ये मोठ्या प्रमाणात भाविकांनी उपस्थिती होती सकाळपासून या गावांना भाविकांची परिसरातून गर्दी झाली होती काही ठिकाणी शिवपार्वतीचा विवाह सोहळा ही साजरा करण्यात आला. एकंदरीत जिल्ह्यातील ठिक ठिकाणचे शिवमंदिर भाविकांनी गजबजून गेल्याचे दिसत होते. अनेक ठिकाणी सुरक्षेतेच्या दृष्टीने पोलीस बंदोबस्त सुद्धा लावण्यात आला होता. यंदाच्या महाशिवरात्रीच्या उत्साहात भाविकांचा उत्सवात प्रामुख्याने मोठ्या प्रमाणात दिसून आला.बुलढाणा शहरात विविध ठिकाणी मंदीर तसेच परिसरात मोठ्या उत्साहात फराळ वाटप करण्यात आलेआहे.बुलढाणा शहर नगरी हर हर महादेवच्या नावाने दुमदुमली होती. सर्व ठिकाणी भक्तीमय वातावरण तयार झाले होते.

# पोलिस हेल्पलाईनवर बोगस कॉल सुनील नवत्रे विरुध्द गुन्हा

**जनसंचलन / जानेफळ**

जानेफळ विनाकारण पोलीसांना फोन करून दिशाभूल करीत त्रास देणाऱ्या देऊळगाव साकर्शा तालुका मेहकर येथील ४१ वर्षीय तरुणास पोलिसांनी अद्दल घडवित त्याच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. दारूच्या नशेत पोलिसांना त्रास देऊन दिशाभूल करण्याच्या उद्देशाने आपल्या मोबाईल वरून सुनील उर्फ पिंटू हरिभाऊ नवत्रे हा वेळोवेळी पोलीस मदत हेल्पलाइनवर विनाकारण कॉल करून त्रास देत होता. अशाच प्रकारे ७ मार्च रोजी त्याने महाराष्ट्र पोलीस दलाने नागरिकांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने तसेच आपातकालीन परिस्थितीत तात्काळ मदत उपलब्ध व्हावी. या उद्देशाने सुरु केलेल्या १२२ क्रमांकाच्या हेल्पलाईन सेवेवर कॉल करून मदत मागितली असता पोलीस कॉन्स्टेबल राजू चव्हाण व चालक गणेश गाभणे यांनी पोलीस स्टेशनचे वाहन घेऊन देऊळगाव साकर्शा येथे पोहोचल्यानंतर स्थानिक प्रतिष्ठीत नागरिक, पोलीस पाटील, सरपंच यांच्या मदतीने शोध घेतल्यानंतर तो दारूच्या नशेत गावातील बसथांबा नजिक आढळून आला. त्यामुळे त्याला विचारणा केली असता त्याने कुठलेच वैध किंवा संयुक्तिक कारण सांगितले नाही. त्यामुळे विनाकारण पोलिसांना त्रास देण्याचा प्रयत्न तो करीत असल्याने त्याच्या विरुध्द अप.नं.७१/२४ कलम १७७ भादवीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन — व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन — व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958